RNI No.MAH MUL/2014/57136
पोस्ट परवाना jal/33/2017-2019

साप्ताहिक
# श्री जलधारा

संपादक : अविनाश कांतीलाल जैन

वर्ष ६ वे | अंक ८ | जळगाव | सोमवार २५ फेब्रुवारी २०१९ | किंमत ४ रुपये | पाने ४






## डॉ. भवरलाल जैन

ओळख देणारी एकही व्यक्ती जवळपास नसल्याने तो तरुण सुमारे १५ किलोमीटर अंतर पायी चालत गेला.

एकदा जळगाव जिल्ह्यातील वाकोद या आपल्या जन्मगावाहून भाड्याने सायकल घेऊन पळसखेडे येथे जाण्याची वेळ त्या तरुणावर आली. सायकलवाल्याने त्यांना ओळख विचारली. ओळखीशिवाय भाड्याने सायकल मिळत नव्हती. ओळख देणारी एकही व्यक्ती जवळपास नसल्याने तो तरुण सुमारे १५ किलोमीटर अंतर पायी चालत गेला. तेव्हा ओळखीसाठी आसुसलेल्या या तरुणाने नंतर जिद्द आणि कष्ट करण्याच्या स्वभावामुळे अशी काही ओळख निर्माण केली की, अगदी भारताबाहेरही त्यांची ख्याती पसरली. ही व्यक्ती म्हणजे जळगावच्या जैन इरिगेशन आणि गांधीतीर्थचे संस्थापक डॉ. भवरलाल हिरालाल जैन ऊर्फ भाऊ!

ठिबक सिंचन यंत्रणेचा प्रचार व प्रसार करून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती आणणारे भाऊ म्हणजे शेतकऱ्यांमध्ये रमणारा माणूस.भाऊंनी १९७८ मध्ये एका शेती उत्पादनाच्या साहाय्यानेच आपल्या औद्योगिक कारकीर्दीचा श्रीगणेशा केला. शेतांमध्ये पपई लागवड करण्यास त्यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. त्यापासून मिळणाऱ्या 'पपई दुधास' त्यांनी हमी भावाची खात्री दिली. खरवडलेल्या विद्रूप पपयाची त्यांनी कँडी-टूटी-फ्रुटी बनविण्यासाठी खरेदी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे शेतकऱ्यांना एक नवीन उत्पन्नाचा मार्ग मिळाला. पपईपासून तयार केलेले 'पपेन' तीन हजार रुपये प्रति किलो या भावाने निर्यात केले. तेच भाऊंचे पहिले शेतीवर आधारित १०० टक्के निर्याताभिमुख असे औद्योगिक साहस ठरले. शेती सिंचनासाठी पीव्हीसी पाइप लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी वेगळीच शक्कल वापरली. गळतीमुळे वाया जाणाऱ्या पाण्याची तसेच बाष्पीभवनाने उडून जाणाऱ्या पाण्याची त्यामुळे बचत झाली. त्यानंतर १९८२ मध्ये तुषार आणि ठिबक सिंचनच्या क्षेत्रात इतिहासच घडला.

जगाच्या ठिबक नकाशावर भारताला क्रमांक दोनचे स्थान मिळवून देण्यात भाऊंचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी स्थापन केलेल्या केळी उती संवर्धन प्रयोगशाळेमुळे देशभरातील हजारो शेतकऱ्यांनी प्रत्येक घडाचे उत्पन्न सरासरी ११ किलोपासून थेट २३ किलोपर्यंत नेले. 'ग्रँडनैन' या नावांची उती संवर्धित रोपांची नवी जात व्यापारी तत्त्वावर वितरित करण्याचा पहिला मान त्यांच्याकडेच जातो. जैन उच्च तंत्र शेती संस्थानमध्ये शेतमालावर संशोधन विकास व प्रात्यक्षिके, प्रशिक्षण असे सर्व काही सुरू असते. एकाच छत्राखाली असलेले शेतीचे हे वैभव पाहण्यासाठी दर वर्षी २० हजार शेतकरी जळगाव येथे भेट देतात. भाज्यांचे निर्जलीकरण आणि फळ प्रक्रिया कारखानेही भलीमोठी गुंतवणूक करून भाऊंनी उभे केले. एकीकडे शेतीवर आधारित उद्योग किंवा प्रकल्प उभारणीस बहुतांश धोका मानत असताना भाऊ यांचे सर्वच व्यवसाय शेती व शेतकऱ्यांशीच संबंधित आहेत. त्यांच्या या कार्यासाठी दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कारांसह एकूण २६ पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. त्यात २००८ मध्ये मिळालेल्या 'पद्मश्री'चाही समावेश आहे.

# भाऊंमुळे शेतीतून ग्रामस्वावलंबन...!

स्त्रियांनी शेतीचा शोध लावला. खऱ्या अर्थाने माता म्हणून नैसर्गिक शक्ती दोनच. आपल्याला जन्म देणारी आई आणि आपले पालन पोषण करणारी धरती. प्रकृती आणि मनुष्य एकत्र आल्यानंतर कुटुंबसंस्कृतीची निर्मिती झाली. एका दाण्यातून शंभर दाणे तयार होण्याची दातृत्वशीलता हे या धरती मातेचे औदार्य. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व सर्वाधिक आहे. कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ती जगभर ओळखली जाते. जगाचा सर्वांगिण विकासाचा आधार कृषिक्षेत्र असून सर्वाधिक रोजगार शेतीतून निर्माण होतो. शेतीतून ग्रामीण भागात शेतीपूरक जोडधंद्यांची निर्मिती होवून खेडी स्वावलंबनाच्या ताकदीवर उभी राहू शकतात, नेमका हाच धागा पकडून जळगावच्या वाकोद गावात एका शेतकरी कुटुंबातील व जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय डॉ. भवरलालजी जैन यांनी ग्रामीण भाग स्वयंपूर्ण व्हावा, या हेतूने कृतज्ञतापूर्वक नवनिर्मितीचे कार्य केले. भाऊंचे अदभूत कार्य सर्वांनाच अनुकरणीय असेच आहे. २५ फेब्रुवारी भाऊंचा स्मृतिदिवस त्यानिमित्त त्यांना नमन...

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'खेड्यांकडे चला आणि स्वदेशीचा वापर करा' हा संदेश दिला. उज्वल भारताचे भवितव्य खेड्यात असल्याचे गांधीजींनी जाणले होते. ग्रामीण भागातील विचार-आचार-संस्कारानुसार त्यांनी आपलं जीवन व्यतित केलं. गांधीजींच्या कृषी व ग्रामीण विकासाचा संस्कार श्रद्धेय डॉ. भवरलालजी जैन यांनी कृतिशिलपणे पाळला, जोपासला, आयुष्यभर व्रतस्थपणे आचरणात आणला.



पुढच्या पिढीलाही या विचारांचे संस्कार दिला. यामुळेच जैन इरिगेशनचे प्रत्येक उत्पादन, संशोधन हे ग्रामीण विकासाचा कणा असलेल्या शेतकऱ्याला धरूनच. कृषीसंस्कृतिबाबत आदरणीय भाऊ म्हणतात. कृषी संस्कृतीत आनंद आहे. सृजन आहे. संवर्धन आहे. आई आणि भूमी यांच्यातील नवनिर्मितीचे तत्त्व वंदनीय आहे. आईला स्वतःच्या लेकरांकडे पाहताना आपण पहा किंवा हिरव्यागार पिकाला वाऱ्यावर डोलताना धरणीमातेला होणारा आनंद संवेदतेने जाणून घ्या, असे पाहण्यात, जाणून घेण्यातच माणसाचे माणूसपण आहे. यावरून कृषिसंस्कृती कृतिशिलपणे आचरणात आणणाऱ्या भाऊंची शेती, मातीशी असणारी निष्ठा सर्वांनाच प्रेरणादायी ठरते.

ग्रामीण अर्थव्यवस्थेत मोठ्याभाऊंचे योगदान शेती व खेड्यांच्या अर्थशास्त्रीय पक्क्या विचारांची बांधिलकी ठेवूनच असून तोच वसा त्यांची पुढची पिढी जोपासत आहे. शेती विकासातील, उद्योगातली अनेक विकासाची कामे भाऊंनी हाती घेतली. जलक्षेत्रातील कर्तबगारी अधोरेखित करावी अशी, पाईप, ठिबक, तुषार सिंचन यासोबतच अभिमानाने सांगावं असं काम म्हणजे जैनहिल्स वरील 'पाणी निर्माण व झाडं, फळझाडं, पर्यावरण'निर्मितीचे संवर्धनाचे कार्य. जैन हिल्स हे शेतकऱ्यांसाठी कृषीपंढरीच. उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, फळबाग तंत्र पाहून अनेक खेड्यांमधील बेरोजगार, शेतकरी प्रभावित होवून मरगळ टाकून आधुनिक शेतीकडे वळले, उभे राहिले. शेतीचं विस्कटलेलं आणि लहरी हवामानावर अवलंबून असलेलं अर्थशास्त्र शिस्तबद्ध नियोजन, योग्य पद्धतींसह, तंत्रज्ञानाचा अचूक अवलंब करीत उभं करून दाखविण्याचं साहसी व पथदर्शी काम मोठ्याभाऊंनी अनेक अडथळे येत असतानाही केलं. भाऊंचे हे कार्य शेती व ग्रामीण विकासाच्या दृष्टीनं महत्त्वाचं; दीपस्तंभासारखच सामाजिक काम आहे. यासाठी 'कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटाची.फ

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. सुरुवातीच्या काळापासून राष्ट्रीय उत्पन्नात असलेला वाटा, भांडवल निर्मितीत वाटा, परकीय चलन प्राप्ती, रोजगार निर्मिती, उपजीविकेचे साधन, औद्योगिक विकासाचा आधार, सेवाक्षेत्राचा विकास आर्दीमध्ये कृषीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कृषी क्षेत्रावर जवळपास ६८ टक्के लोकसंख्या अवलंबून आहे. भारतातील प्रमुख उद्योगाला कच्च्या मालाचा पुरवठा हा कृषिक्षेत्राकडूनच प्राप्त होत असतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार केला तर अधिकांश भाग हा कृषी व्यापाराशी जोडला गेला आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषीचा वाटा १९५०-५१ मध्ये ६५.५ टक्के तर २०११-१२ मध्ये १३.९ टक्के दिसून येतो. हे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असले तरी लोकसंख्या वाढत असूनही शेतीक्षेत्र दरडोई प्रति दिवशी पुरविल्या जाणाऱ्या अन्नधान्याची पातळी राखू शकले हे विशेष. हे शक्य झाले ठिबक सोबतच शेतीत वापरल्या जाणाऱ्या नव तंत्रज्ञानामुळे.

थोडक्यात देशातील जनतेला अन्नधान्यांचा पुरवठा करणारे क्षेत्र म्हणून कृषिक्षेत्राचा विचार केला जातो. म्हणूनच श्रद्धेय मोठेभाऊ म्हणतात, 'देशातील शेतीची उत्पादकता आपण पूर्णपणे विकसित करू शकलो तर जगाच्या अन्नधान्याची गरज आपण निम्म्याने पूर्ण करू शकू.'शेतकरी हा केवळ देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा नव्हे, तर देशाच्या संस्कृतीचा मजबूत पायासुद्धा आहे. आणि ह्या संस्कृतीला पाठबळ द्यावयाचे असेल तर खेड्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. त्यादृष्टीने पावले उचलेली पाहिजे. यातून बलशाली भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकते. ग्रामीण विकासात कृषिसंस्कृतीचे योगदान, गावात राहणाऱ्या प्रत्येकाची जबाबदारी, महिलांची राजकीय आणि सामाजिक स्थिती यासह अनेक महत्त्वपूर्ण बाबींवर प्रेरणादायी मार्गदर्शन पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन यांच्या एक न संपणारा प्रवास, ग्रामीण विकास या पुस्तकातून मिळते.

महात्मा गांधीजींच्या संस्कारांचे कोंदण लाभलेल्या भाऊंनी गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या माध्यमातून गांधी तीर्थ ही जागतिक दर्जाची वास्तू साकारली. जैन इरिगेशन आणि गांधी रिसर्च फाऊंडेशन संयुक्त विद्यमाने 'बा-बापू १५०'जयंती अंतर्गत दीडशे खेडी स्वयंपूर्ण विकसित करण्याचा संकल्प केला आहे. या खेड्यांमध्ये लोकसहभागातून विविध समाजोपयोगी कामे, जलसंधारण, शेतीपूरक लघु व गृह उद्योगांबाबत चर्चासत्रे, प्रशिक्षण घेतले जात आहेत. याचे भविष्यात सकारात्मक परिणाम होवून शेतीपुरक उद्योगांची वृद्धी होण्यास वाव आहे. यामुळे शेतीतून ग्रामविकासाचे स्वावलंबन होवून श्रीमंतांचा गरीब देश ही ओळख पुसली जावू शकते. यासाठी कृषिक्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबतच, कृषिपूरक धोरणे असावीत त्याहूनही अधिक भवरलालजी जैन यांच्यासारखे शेतीविषयी सकारात्मक विचार असलेल्या अन्य मार्गदर्शकांनी पुढे येण्याची गरज आहे. जेणे करून शेतकऱ्यांना उन्नतीचा मार्ग गवसेल. हे कार्य जैन इरिगेशन चोखपणे करीत असल्याचा जळगावकरांना अभिमान आहे. कृषिदिनी कृषी विकासातून ग्रामस्वावलंबनात माझा सहभाग कसा असेल, यावर विचार करण्याची गरज आहे. यातून उद्याचा बलशाही भारत आपल्याला पाहता येईल. जागतिक महासत्ता असलेल्या देशांच्या पंगतीत भारताला न्यायचे असेल तर कृषिविकासाशिवाय पर्याय नाही.

- आरिफ आसिफ शेख,
मीडीया विभाग, जैन इरिगेशन सिस्टीम्स, जळगाव
मोबाईल - ९८८१०५७८६८